# B.K. BIRLA CENTRE FOR EDUCATION

SARALA BIRLA GROUP OF SCHOOLS
A CBSE DAY-CUM-BOYS' RESIDENTIAL SCHOOL

## TERM-1 EXAMINATION (2026-27)

**MARATHI [SET-ONE]**

Class : VII — Duration: **3** Hrs
Date : 31.08.2026 — Max. Marks: **80**
Admission No.: — Roll No.:

---

कृतिपत्रिकेसाठी सूचना :

(1) स्वच्छता, नीटनेटकेपणा व लेखननियमांनुसार लेखन यांकडे जाणीवपूर्वक लक्ष दयावे.

---

## विभाग – अ (वाचन व आकलन )

**प्र 1खालील अपठित उतारा वाचून दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा:–** **(5X1=5)**

एकदा एक शिकारी शिकारीसाठी जंगलात आला. त्याने एक जाळे शेतामध्ये पसरून ठेवले थोडयाच वेळात कबुतरांचा एक थवा आकाशातून उडत तेथे आला. सर्व कबुतरे दाणे टिपण्यासाठी खाली उतरले. आणि सर्वजण जाळयात अडकले होते. कबुतरांच्या प्रमुखाला एक युक्ती सुचली तो सर्वांना म्हणाला जाळयासकट आकाशात उडा. आणि जाळयासह ती कबुतरे दूर उडून गेली आणि वनात इतर प्राण्याच्या मदतीने जाळयातून मुक्त झाली. एकीच्या बळामुळेच हे शक्य झाले .

**(क)** शिकारी शिकारीसाठी कोठे गेला?

**अ** शेतात **ब** वनात **क** जंगलात

**(ख)** त्याने शेतामध्ये काय पसरून ठेवले?

**अ** फळे **ब** जाळे **क** दाणे

**(ग)** कोणाचा थवा आकाशात उडत होता?

**अ** कबुतरांचा **ब** चिमण्यांचा **क** घारींचा

**(घ)** कबुतरांच्या प्रमुखाला काय सुचली?

**अ** कला **ब** विचार **क** युक्ती

**(ङ.)** कशाच्या बळामुळे त्याची सुटका झाली?

**अ** एकीच्या **ब** नेकीच्या **क** श्रीमंतीच्या

**प्र 2 अपठित पदयांश –** **(5X1=5)**

पावसा रे पावसा तू दिसतो कसा ?
टपटप आभाळातून पडतो कसा ?
वाटतं तुझ्यात ओलेचिंब भिजावे
मित्रांसोबत नाचत गात हुंदडावं !
वाहत्या पाण्यात एक नाव चालवावी

हळूच एक बुडती मुंगी चढवावी !

आई खेळू देत नाही सर्दी होईल म्हणून

करमत नाही मुळीच मला घरी बसून

**(क)** वाहत्या पाण्यात काय चालवावी असे कवीला वाटते?

**अ** नाव **ब** जहाज **क** बोट

**(ख)** पावसात कोण खेळू देत नाही?

**अ** बाबा **ब** भाऊ **क** आई

**(ग)** पाऊस कोठून पडतो?

**अ** घरातून **ब** आभाळातून **क** खिडकीतून

**(घ)** मुलाला कोणासोबत नाचावासे वाटते?

**अ** मित्र **ब** मामा **क** काका

**(ङ.)** पाऊस कसा पडतो?

**अ** धो धो **ब** सो सो **क** टपटप

## खंड ख व्याकरण

**प्र 3 समानार्थी शब्द लिहा– (कोणतेही दोन)** **(2X1=2)**

**(1)** रोष =

**(2)** गाणी =

**(3)** डोळा =

**प्र 4 विरुधार्थी शब्द – ( opposites ) (कोणतेही दोन)** **(2X1=2)**

**(1)** हसणे x

**(2)** उत्साही x

**(3)** आधी ×

**प्र 5 लिंग बदला – ( change the gender ) (कोणतेही दोन)** **(2X1=2)**

**(1)** पुत्र =

**(2)** राजा =

**(3)** काका =

**प्रश्न 6 वचन बदला – (write the plural noun ) (कोणतेही दोन)** **(2X1=2)**

(1) जिल्हा =

(2) झरा =

(3) गोष्ट =

**प्र 7 खाली प्रत्यय लावून नवीन शब्द बनवा –** **(2X1=2)**

(1) वही + खाली =

(2) पुस्तका + खाली =

**प्र 8 खालील वाक्यातील सर्वनाम ओळखा :–** **(2X1=2)**

(1) मी आणि तू उदया खेळायला जाऊ.

(2) काकांनी माझी अभ्यासात मदत केली.

**प्र 9 काळ ओळखा –** **(2X1=2)**

(1) गाडीचा दरवाजा बंद झाला.

(2) आजोबा उदया गावाला जाणार.

**प्र 10 खालील वाक्यातील कियापद ओळखा –** **(2X1=2)**

(1) अमन संध्याकाळी शाळेतून घरी आला.

(2) विनूने काल मांजरीला दुध दिले.

## खंड ग साहित्य

**प्रश्न 11 कोण कोणास म्हणाले लिहा –** **(2X1=2)**

(1) ही तयारी आम्ही नाही केली.कामधेनूने केली.

(2) मग चला रे ओढा त्या कामधेनूला.

**प्रश्न 12 खालील प्रश्नांची उत्तरे लिहा – ( कोणतेही सात )** **(7x2=14)**

(1) विश्वमित्र कोणाच्या आश्रमात गेले व का?

(2) विश्वमित्रांनी कोणता निश्चय केला व का ?

(3) निजबाळांसह कुरणात कोण बागडत आहे ?

(4) कोणाचा रोष मावळला ?

(5) वर्ल्ड  हेरिटेज साईट कोणाला म्हणतात ?

(6)  सातारा जिल्हातील थंड हवेचे ठिकाण कोणते?

(7) मनुष्याने नेहमी कोणत्या गोष्टीचा शोध घ्यावा ?

(8) श्वानवृत्ती कशास म्हटले आहे ?

(9) कधी आपलेच नुकसान होते ?

**प्र 13 पठित गदयांश –** **(5X1=5)**

माळशेज घाट हा नगर–कल्याण रस्त्यावर आहे . येथे लोक मुसळधार पावसाचा आनंद घेण्यासाठी येतात. येथे भिजतांना जर हात उंचावला तर हातात ढग येण्याची शक्यता असते. चोहीकडे मखमली हिरवळीचे गालीचे पसरलेले  दिसतात.अशा धुंद वातावरणात पावसात चिंब होण्याचा आनंद वेगळाच असतो. हा घाट मुंबई–पुण्यापासून जवळच आहे. कल्याणपासून 86 कि.मी. चा टप्पा दीड–दोन तासात संपतो. माळशेज परिसरात आलं की उंचच उंच गिरिशिखरं दिसतात.

(1) माळशेज परिसरात आलं की काय दिसतात?

(2) माळशेज घाट कोणत्या रस्त्यावर आहे ?

(3) चोहीकडे कशाचे गालीचे पसरलेले दिसतात?

(4) कल्याण पासून हा घाट किती कि.मी. अंतरावर आहे?

(5) हात उंचावला तर हातात काय येण्याची शक्यता असते?

**प्र 14 पठित पदयांश –** **(5X1=5)**

श्रावणमासी हर्ष मानसी हिरवळ दाटे चोहीकडे
क्षणात येते सरसर शिरवे क्षणात फिरूनी ऊन पडे
वरती बघता इंद्रधनूचा गोफ दुहेरी विणलासे
मंगल तोरण काय बांधिले नभोमंडपी कुणि भासे
झालास सूर्यास्त वाटतो सांज अहाहा! ते उघडे
तरुशिखरावर उंच घरांवर पिवळे पिवळे ऊन पडे

(1) कवितेत कोणत्या महिन्याचे वर्णन केले आहे ?

(2) नभोमंडपी कसे तोरण बांधले आहे ?

(3) कशाचा गोफ विणला आहे ?

(4) तरुशिखरांवर कसे ऊन पडले आहे ?

(5) क्षणात काय येते ?

**प्र 15 जोडया लावा –** **(4X1=4)**

1 विचार – दूर

2 भरती – छोटी

3 जवळ – अविचार

4 मोठी – ओहोटी

**प्र 16 रिकाम्या जागा भरा –** **(4X1=4)**

**( गिरिशिखरे / रानफुले / ऋषीने / प्रेक्षणीय )**

(1) एका –––– आपला पराभव केला.

(2) महाराष्ट्रात बरीच ––––––– स्थळे आहेत.

(3) उंचच उंच ––––––– दिसतात

(4) असंख्य प्रकारची –––––– दिसतात.

**प्रश्न 17 आपल्या आवडत्या घडयाळासाठी एक आकर्षक जाहीरात तयार करा –** **(1X5=5)**

**प्रश्न 18 निबंध लेखन :– ( कोणताही एक )** **(1X5=5)**

(1) माझा आवडता महिना

(2) माझा आवडता खेळ

(3) वृक्ष आपले मित्र

**प्र 19 स्वपरिचय लिहा :– ( my self in marathi )** **(1X5=5)**

**प्र 20 :–प्रत्र लेखन –** **(1X5=5)**

आपली खुशाली कळविणारे पत्र आईस लिहा –

**किंवा**

आपल्या वाढदिवसाचे निमंत्रण देणारे पत्र मामास लिहा –

**:::::::::::::::::::::: समाप्त ::::::::::::::::::::::::**